# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९०७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९०७३४१


रासेयो/९५। /२०१३ दि. २२/११/२०१३

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**पुणे, अ.नगर, नाशिक जिल्हा**

**विषय :** अवयव दान (Organ Donation) व थॅलेसेमिया (Thalassemia) चाचणी उपक्रमाबाबत...

**मा. महोदय,**

मा. राज्यसंपर्क अधिकारी यांचे पत्रानुसार पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांकरीता अवयवदान व थॅलेसेमिया चाचणी उपक्रमाबाबत कळवीले आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की आपल्या महाविद्यालयामध्ये रासेयो मार्फत वरील दोन्ही उपक्रमाची अमंलबजावणी सार्वजनीक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र वैद्यकीय शास्त्र विद्यापीठ यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, प्रदर्शन, बॅनर या स्वरूपात करण्यात यावी.

वरील उपक्रमामध्ये रासेयो विद्यार्थ्यांमध्ये अवयवदान विषयी जनजागृती करून जे विद्यार्थी अवयव दान करण्यास तयार होतील अशा विद्यार्थ्यांची नोंद करावी. तसेच थॅलेसेमियाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणिव निर्माण करून ज्या विद्यार्थ्यांना थॅलेसिमियाची चाचणी करावयाची आहे अशा विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेवून त्यांची रक्त चाचणी (Blood Screening) घेण्यात यावी.

सदर उपक्रमाचा खर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा या उपक्रमाचा संपूर्ण अहवाल, छायाचित्रे, वर्तमानपत्रातील कात्रणे रासेयो कार्यालयास व राज्यसंपर्क अधिकारी कार्यालयास nss@unipune.ac. व atulsalunke2007@rediffmail.com या मेल आयडीवर मेल करावे, ही विनंती.
कळावे

आपला विश्वासू
21/11/13
**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

Pc2/Tin Job/Daily Lette206


**Website : http://www.unipune.ac.in/nss e-mail : nss@unipune.ac.in**

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 08 NOV 2013
आवक क्रमांक व्हीसी 6128
आवक दिनांक 09/11/2013

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक रासयो-२०१३/प्र.क्र. १०४ /१३/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय कक्ष
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक - १ नोव्हेंबर, २०१३

NSS Co-ordinator
9/11/13

राष्ट्रीय सेवा योजना
आवक 1230
दिनांक 11/11/13

प्रति,

१) मा.कुलगुरु (सर्व विद्यापीठे)
२) सहायक शिक्षण संचालक, +२ स्तर, पुणे
३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
४) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण / प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

विषय : अवयव दान (Organ Donation) व थॅलेसेमिया (Thalassemia)चाचणी उपक्रमाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत वरील दोन्ही उपक्रमांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. त्यासाठी आपणांस सार्वजनिक आरोग्य विभाग , वैद्यकीय शिक्षण विभाग व महाराष्ट्र वैद्यकीय शास्त्र विद्यापीठ यांची मदत होईल.

वरील उपक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांमध्ये अवयव दानाविषयी जनजागृती करुन जे विद्यार्थी अवयव दान करण्यास तयार होतील अशा विद्यार्थ्यांची त्यांच्या ओळख पत्रावर "Organ Donor" अशा स्वरुपाची नोंद करावी. त्याचबरोबर थॅलेसिमियाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणिव निर्माण करुन ज्या विद्यार्थ्यांना थॅलेसिमियाची चाचणी करावयाची आहे अशा विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेवून त्या विद्यार्थ्यांची चाचणी (Blood Screening) घेण्यात यावी.

महाविद्यालयातील व विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, प्रदर्शन, बॅनर या स्वरुपामध्ये उपक्रम राबवावे. या उपक्रमांसाठी विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजना विभागास योग्य ते सहाय्य करावे. तसेच, या उपक्रमामध्ये ज्या स्वयंसेवी संस्था कार्य करत आहेत त्यांना विद्यापीठाच्या उपक्रमामध्ये सहभागी करुन घ्यावे. या कार्यासनास वर्षभरातील कार्य आढावा,छायाचित्रे, वर्तमान पत्रातील कात्रणे यासह अहवाल पाठवावा.

आपला,

(डॉ.अतुल हं.साळुंके)
विशेष कार्य अधिकारी / राज्य संपर्क अधिकारी

प्रत : माहितीसाठी अग्रेषित.
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
सर्व कार्यक्रम समन्वयक